नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०२/२०२५ (शनिवार) संध्याकाळ**

# पोलीस स्टेशन खापरखेडा मर्ग क्र १३/२०२५

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— आज दिनांक १५/०२/२०२५ वा ११:५७ वा डायल ११२ वर माहिती मिळाली की आईस फॅक्टरी जवळ एक इसम व गाडी जळत आहे.अशा माहिती प्राप्त होताच खापरखेडा पोलीस तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. पोलीसांनी घटनास्थळी पोहोचून गाडीचे इंजिन व चेचिस नंबर वरून मालकाचे नाव ललित सुखराम वास्त्राने, रा.वार्ड क्रं ३ खापरखेडा जि. नागपुर असे निष्पन्न केले. घटने अनुषंगाने ऐ पी बार चे सिसिटीव्ही फुटेज चेक केले असता यातील मृतक हा एकटाच मोटार सायकलने आईस फॅक्टरी कडे येताना दिसत आहे. मृतकाची पत्नी सुखिया ललित वस्त्राने हिला विचारपूस केली असता तिने मृतकास ओळखून माझे पती ललित सुखराम वस्त्राने, वय ४२ वर्षे, रा. वार्ड न ३ खापरखेडा , जि. नागपुर असे असल्याबाबत खात्रीशिर सांगितले.तसेच तिने सांगितले “की मृतक हा दारू पिण्याच्या सवियीचा असून काल रात्री त्याचे घरी भांडण झाले त्यात त्याने मी स्वत:ला पेटवून घेईल गाडी जाळून टाकीन म्हणून गाडीची तोडफोड केली होती” अशी माहिती प्राप्त झाली.

**प्रथमदर्शनी यातील मृतकाने स्वत:चे अंगावर पेट्रोल टाकून आत्महत्या केल्याचे दिसत असून सदर प्रकरणात खापरखेडा पोलीस स्टेशन येथे मर्ग नोंद असून सखोल चौकशी खापरखेडा पोलीस करीत आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर